GAP भाषा
A MULTILINGUAL JOURNAL OF RESEARCH
( ISSN – 2582-8770 )
Globally peer-reviewed and open access journal.

# श्री वेणास्वामी - एक धगधगीत व्यक्तिमत्त्वाच्या स्त्री संत

**डॉ. सौ. शर्वरी कुलकर्णी**

(सहायक प्राध्यापिका गणित)
मॉडेल महाविद्यालय (स्वायत्त) ,खंबालपाडा, डोंबिवली
जिल्हा - ठाणे, मुंबई, भारत
झीप कोड - ४२१२०३

**सारांश**

*व्यक्ती हित आणि समाज हित यांची एकमेकांशी दृढ सांगड घालून समाजाचे संवर्धन तसेच संरक्षण केले पाहिजे ही महाराष्ट्र मधल्या सर्व साधू संतांची प्रबळ धारणा होती. लोकमानसाची मानवी जीवनावरील आणि धर्मावरील श्रद्धा दृढ करताना अविवेकाची काजळी झाडून विवेक दीप प्रज्वलित करण्याचे व्रत संत श्रेष्ठांनी घेतले. अशा थोर लोकोत्तर महापुरुषांच्या संत मालिकेत अत्यंत प्रतिभावंत श्री वेणास्वामी या सतराव्या शतकातील श्री समर्थ शिष्या होत्या. महाराष्ट्र धर्म स्थापनेच्या काळी महाराष्ट्र समाजात ज्या स्त्रिया होऊन गेल्या त्यांची योग्यता कशा प्रकारची होती याची कल्पना श्री वेणास्वामींच्या व्यक्तिमत्त्वावरून येते. वेणास्वामी लहानपणापासूनच विरक्त बुद्धिमान, जिज्ञासू, वाचन कीर्तनाची आणि श्रवणाची आवड असणाऱ्या संत होत्या. एक स्त्री असूनही मठाधिपती झालेल्या, संस्कृती विचारधारेचा प्रसार करणाऱ्या, विपुल लेखन करणाऱ्या, आध्यात्मिक अधिकार मिळवणाऱ्या एक प्रतिभावंत स्त्री संत होत्या. मध्ययुगाच्या अंधकारमय परिस्थितीतून बाहेर पडून श्री वेणास्वामींनी विचारांचे जागरण घडवले ते ऐतिहासिक ठरले. भक्ती भावाने ग्रंथ वाचताना त्यातील ज्ञान मिळवण्यासाठी त्यांनी जीव, शिव, आत्मा, अनात्मा, प्रपंच, माया, बद्ध, मोक्ष या विषयांवर श्री समर्थांना पंचवीस प्रश्न एका अभंगात विचारले. त्यांना अभंगातच याचे उत्तर श्री समर्थांनी दिले. त्यांच्या साहित्यात प्रपंच व परमार्थ साधून समाधान मिळवण्याचे तत्वज्ञान सूक्ष्मपणे सांगितले आहे. सतराव्या शतकात समाज स्वार्थाने बरबटलेला होता आजही एकविसाव्या शतकात जवळजवळ तशीच परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत वेणास्वामींचे धगधगीत व्यक्तिमत्व व त्यांचे विचार जगासमोर यावे या हेतूने हा संशोधन पेपर लिहीत आहे.*

***मुख्य शब्द*** *- धगधगीत, विवेक, अविवेक, तत्त्वज्ञान, परमार्थ*

## उद्दिष्टे -

1)महाराष्ट्रातील संतपरंपरेचा प्रामुख्याने स्त्री संत परंपरेचा, समाज घडविण्यासाठी केलेल्या योगदानाचा अभ्यास करणे.
2) आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये अनेक धार्मिक ग्रंथ आहेत, त्यांच्या वाचनाचे महत्त्व जाणण्याचा प्रयत्न करणे.
3) सतराव्या शतकातील स्त्री संत श्री वेणा स्वामी यांचा परिचय करून घेणे.
4) श्री वेणस्वामींनी केलेल्या लेखनाचा परिचय करून घेणे, तसेच श्री वेणास्वामी आणि श्री समर्थांच्या झालेल्या संवादातून परमार्थ समजून घेण्याचा प्रयत्न करणे.

## प्रस्तावना -

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संतपरंपरेने आदर्श मानवी मूल्यांचा संस्कार समाजावर केला व माणुसकीला प्रतिष्ठा मिळवून दिली. संतांनी स्फुट पदे, अभंग, श्लोक, ओव्या, ग्रंथ इत्यादी लिहून सामान्य जनमानसाच्या मनावर संस्कार केले व मराठी वाङ्मय समृद्ध केले. महाराष्ट्रातील मुख्य संत म्हणजे संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास, संत चोखामेळा, संत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज इ. स्त्रीत्वाच्या पलीकडे जाऊन ज्यांनी चैतन्य तत्त्वाचा शोध घेतला अश्या स्त्री संत आपल्या संस्कृतीने जपल्या आहेत. अनेक स्त्री संतांनी गुरुपद भूषविले आहे आणि त्यांचा अधिकार मानणारा पुरुष शिष्य परिवार ही निर्माण झाला आहे. महाराष्ट्रात महदंबा बाई, आवसाबाई, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, वेणाबाई अक्काबाई, गंगाबाई, सोयराबाई, निर्मलाबाई अश्या अनेक स्त्री संत होऊन गेल्या. त्यांनी आयुष्याशी संघर्ष करून हिमतीने मूल्यांना नवीन अर्थ दिले. [4,5]
आपल्या भारतात अनेक धार्मिक ग्रंथ आहेत. वेद, उपनिषद, पुराण, ज्ञानेश्वरी, भगवद्गीता, रामायण, महाभारत, दासबोध, भागवत इत्यादी अनेक ग्रंथ प्राचीन काळापासून भारताची संपत्ती आहे. सर्व संतांनी त्यांच्या काळात मृतप्राय झालेल्या समाजाला आपल्या वाणीने व लेखणीने अमृत संजीवनी देऊन जागृत केले. भक्तिमार्गाला कर्मनिष्ठेची जोड देऊन समाजाला क्रियाशील बनवले. ग्रंथांच्या निर्मितीतून संतांनी अबाल - वृद्ध, प्रपंची - परमार्थी, बद्ध - मुमुक्षु, साधक, गृहस्थी - वानप्रस्थ या सर्वांना प्रकाशाचा म्हणजेच ज्ञानाचा मार्ग दाखविला. हे ग्रंथ मानवी जीवनाची व्यावहारिक, सामाजिक व अध्यात्मिक उन्नती करून स्वरूपाची ओळख करून देण्याचा प्रयत्न करतात. ज्या ठिकाणी जीवानी विसावा घ्यावा अशी ही ग्रंथ संपत्ती सुखाचा आनंद देणारी आहे.
ध्येयहीन, क्रियाहीन वअर्थहीन झालेले समाजमन चैतन्य शक्तीने जागृत करण्यासाठी धर्मकीर्तन वारंवार उभे केले पाहिजे, हे भारतात सर्वप्रथम महाराष्ट्रीय संतांनी जाणले होते. अश्या थोर लोकोत्तर संतांच्या मालिकेत समर्थ रामदास हे फार मोठे संत होते. ते किर्तनाद्वारे लोकांना प्रपंच व परमार्थाचा बोध करीत. त्याचा परिणाम होऊन ज्यांच्या मनोधारणेत पालट होईल ते समर्थांचे शिष्य बनत. शिष्यवर्गात पुरुषांबरोबर स्त्रियांचाही समावेश होता. स्त्रिया व पुरुष परमार्थाचे सारखेच अधिकारी असतात ही समर्थांची शिकवण होती. अनेक बाल विधवांना अनुग्रह देऊन समर्थांनी त्यांना परमार्थाच्या मार्गावर आणले. त्यातील एक नाव म्हणजे वेणाबाई.
वेणाबाई या गोपजी गोसावी देशपांडे यांची कन्या वेणू. कोल्हापूर हे तिचं माहेर आणि मिरज हे तिचं सासर होते. त्या काळात स्त्रियांना दुष्प्राप्य असलेले शिक्षण त्यांना भाग्याने प्राप्त झालं होतं. वयाच्या आठव्या वर्षी मिरजेतल्या देशपांडे आडनावाच्या मुलाशी त्यांचे लग्न झालं होतं आणि अल्पावधीतच त्यांच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली.

**हीन भाग्य मी काळ कंठिते। वेळ जावया ग्रंथ वाचिते।**
**गुरुजी सांगती त्यात श्रीहरी। देई दर्शना दुःख तो हरी।**

गीता, भागवत रामायण आदि गन्थ हेच आता आपलं सर्वस्व मानून त्यांच्या वाचन चिंतनात वेणू सासरी विवेकान काळ कंठत होती. पुढे वेणाबाई कोल्हापुरास माहेरी गेल्या. तिथं रामदासांची कीर्तनं चालू होती. आई-वडिलांना विचारून वेणाबाई किर्तन श्रवणास जात आणि त्यात तल्लीन होऊन जात. एके दिवशी कीर्तन झाल्यावर त्यांनी समर्थांच्या चरणी मस्तक

https://www.gapbhasha.org/

GAP भाषा
A MULTILINGUAL JOURNAL OF RESEARCH
( ISSN – 2582-8770 )
Globally peer-reviewed and open access journal.

ठेवलं आणि अनुग्रह करण्याची विनंती केली. श्री रामदासांनी त्यांना राम मंत्रोपदेश दिला. भोवतालच्या लोकांना हे आवडले नाही. काही लोकांनी तर त्यांना स्वैरपणे वागू लागल्याचे आरोप लावले. वेणाबाईंचे आई-वडील सासू-सासरे यांना लोक नावे ठेवू लागले. तेव्हा आई-वडिलांनी ही गुरुभक्ती सोडण्याबद्दल मुलीला सांगून पाहिले. वेणाबाई सर्वस्वी उदास झाल्या होत्या. ज्यांचे जीवन तपश्चर्येने तापलेलं असते अशा व्यक्तिमत्त्वाला धगधगीत व्यक्तिमत्व म्हणतात. वेणास्वामी या अशाच एका धगधगीत व्यक्तिमत्त्वाच्या स्त्री संत होत्या.[1]

त्या म्हणत -

**मन उदासीन, नवे समाधान, जीवीच्या जीवना ये**
**दिन लोटे ना रे, रजनीकंठवेना, तुजविण करू काये,**
**नयनी नीर वाहे, अवस्था दाटत आहे, वेणी हृदय उलू पाहे.**

**अध्यात्मिक भूमिका –**

त्यांना लहानपणी भागवत वाचण्याची मोठी आवड होती. त्या ग्रंथाचे वाचन करीत असताना तेथे समर्थ आले आणि त्यांनी वेणा बाईंना प्रश्न विचारला की कोणते ग्रंथ वाचित आहेस आणि त्या ग्रंथात काय सांगितले आहे? जे सांगितले आहे त्याचा प्रत्यय येतो का? तेव्हा वेणा बाई म्हणाल्या की त्या भक्ती भावाने ग्रंथ वाचतात. त्यातील ज्ञान त्यांना माहीत नाही. ते ज्ञान मिळवण्यासाठी वेणा बाईंनी समर्थांना एका अभंगात दहा कडव्यात 25 प्रश्न विचारले-

- जीव कोण? आत्मा कसा असतो? प्रपंच म्हणजे काय?
- विद्या म्हणजे काय? बद्ध कोण आणि मुक्त कोण? सगुण व निर्गुण म्हणजे काय?
- ज्ञानी कोण? चैतन्य कसे असते? समाधान कोणते?

असे अनेक मार्मिक प्रश्न विचारले.

श्री समर्थांनी वेणाबाईंच्या प्रश्नांची उत्तरे एका अभंगा द्वारे दिली. ते म्हणाले

- जीव म्हणजे अज्ञान.
- आत्मा आणि परमात्मा म्हणजे- आपल्या देहात जो वास करतो तो आत्मा, सर्व विश्वात चराचरात वास करतो तो अंतरात्मा आणि विश्वाला पुरून उरतो तो परमात्मा असतो.
- आपलं कुटुंब, घर, संपत्ती याला आपण प्रपंच म्हणतो. ते मायेने निर्माण होते आणि मायेनेच नष्ट होते.
- समाधान तेव्हाच मिळते जेव्हा आपण आपली देहबुद्धी सोडतो.
- देवांच्या मूर्ती म्हणजे सगुणरूप आणि सगुण रूपाच्या आधारेच आपण निर्गुण ब्रह्म मिळवायचा प्रयत्न करीत असतो. निर्गुण म्हणजे जे निर्विकार व निराकार आहे ते.[1]

या प्रश्नांची उत्तरे मिळाली आणि वेणा बाई खूप प्रभावीत झाल्या. त्यांचा उपदेश ऐकून वेणाबाईंनी स्वतःला श्री समर्थ चरणी वाहून घेतले.

यानंतर मात्र वेणाबाईंनी आप्तेष्टांचा संबंध पूर्णपणे सोडला आणि त्या समर्थांच्या शिष्य शाखेत दाखल झाल्या. मठातल्या उपहाराची व्यवस्था पाहण्याचं काम त्यांच्याकडे आलं. मठात कीर्तन प्रवचन पुराण सतत चालत. ते त्या ऐकत आणि ग्रंथ वाचनही करीत. तेव्हापासून त्या समर्थांच्या एकनिष्ठ भक्त झाल्या. समर्थांच्या शिष्य परिवारात त्यांचे अशा प्रकारे शिक्षण चालू असताना त्यांची स्वतःची काव्यरचना ही उस्फूर्तपणे होऊ लागली. इसवी सन १६५६ मध्ये त्यांच्या जीवनातली आणखी एक महत्त्वपूर्ण घटना घडून आली. त्यावर्षी समर्थांनी मिरजेत मठाची स्थापना करून त्याचं महंत पद वेणाबाईंना दिलं. तिथे त्या वेणा बाईंच्या श्री वेणास्वामी झाल्या. तेव्हा सुद्धा लोकांनी खूप चर्चा केली आणि मठाधिपती ही विधवा स्त्री कशी असू शकते, असे प्रश्न लोकांनी उभे केले. पण समर्थांनी वैराग्य आणि परमार्थाचे पूर्ण शिक्षण देऊन वेणास्वामींना मठाधिपती केले होते. त्यांना पूर्ण खात्री होती कि माझ्या शिष्याचे वर्तनच लोकांच्या चर्चेला उत्तर देईल. अशाप्रकारे वेण्णा स्वामींनी मिरजेच्या मठाचं धुरीणत्व सतत २२ वर्षे कार्य कुशलतेने सांभाळल. वेणास्वामींनी आपला शिष्यवर्ग जमविला होता.

त्यांनी मठाधिपती असताना भरपूर लेखन केले. पूर्वी स्त्रियांनी आपल्या काव्यासाठी ओवी छंद वापरला आहे. संत मुक्ताबाई आणि संत जनाबाई यांची गीते ओवीबद्ध आहेत. तशीच वेणाबाईंच्या रचना आख्यान काव्य प्रकारातील आहेत. वेणाबाईंनी 'सीता स्वयंवर' हे आख्यान काव्य रचलेले आहे. त्यांची प्रतिभा आणि वर्णन करण्याची शैली अद्वितीय आहे. 'सीता स्वयंवर' ही त्यांची सुप्रसिद्ध रचना आहे. या ग्रंथात १४ समास व १५६८ ओव्या आहेत. त्यांनी उपदेश रहस्य ,कौल ,वेदांतावर पंचीकरण, रामायणाची कांडे, सिंहासन, अभंग ,स्फुट प्रकरणे, पदे ,आरत्या असे विपुल लेखन केले आहे. सतराव्या शतकातील एक स्त्री एवढ्या प्रभावीपणे आणि प्रसादिक शब्दात विविध ग्रंथांचे चिंतन करू शकते ही गोष्ट थक्क करून टाकणारी आहे. [2,3]

## समारोप -

पूर्वी स्त्रिया बसून कीर्तन करीत असत. परंतु श्री समर्थांनी या पारलौकिक वैभवाने श्रीमंत असलेल्या आपल्या शिष्येला उभ्याने किर्तन करण्याची परवानगी दिली होती. कीर्तन करणाऱ्या त्या एकमेव पहिल्या स्त्री शिष्या होत्या. त्या नेहमी समर्थांना मला माहेरी जायचं आहे असा हट्ट करायच्या. त्यांचं माहेर म्हणजे गुरुचरणाचे स्थान आणि एके दिवशी ती वेळ आली. त्यादिवशी म्हणजे १६७८ साली त्यांनी निरूपणा करिता अभंग घेतला होता –

**बंध विमोचन राम, माझा बंध विमोचन राम ।**
**सकळ ही ऋषीमुनी भजती जयासी, एकचि तो सुखधाम।**
**सद्गुरू कृपा ओळखीला जो, कौसल्येचा राम।**
**भावभक्तीला सुलभ साधनी, पुरवी सकळही काम।**
**शरण ही वेणा आत्मारामा, पावली पूर्णविराम।**

किर्तन झाले आणि आणि योग मार्गाने त्यांनी आपले प्राण श्री समर्थांच्या चरणी विलीन केले. अशा धन्य धन्य त्या वेणास्वामी. वेणा हे नदीचे नाव आहे, नदीप्रमाणे मानवी जीवन प्रवाही आहे. त्या प्रवाहामध्ये सुख आणि दुःख दोन्ही बरोबर वाहत असतात. ती सोसतच नदी सागराला मिळते आणि आपले अस्तित्व विलीन करते. दुसरा अर्थ वेणा म्हणजे प्रसव वेदना ! समर्थ म्हणतात

**जो संसार दुखे दुखवला**
**त्रिविध तापे पोळला**

https://www.gapbhasha.org/

**तोची अधिकारी भला परमार्थासि.**

या न्यायाने संसार दुःख सोसून वेणा स्वामींनी आत्मज्ञान प्रसवले आणि स्वामी पदाला पोहोचल्या !
त्यांना शत शत नमन !

## निष्कर्ष

1. महाराष्ट्रातील संत परंपरेने समाजाला मध्ययुगाच्या अंधकारमय परिस्थितीतून बाहेर पडून विचारांचे जागरण घडविले.
2. धार्मिक ग्रंथ आपल्याला कर्म उपासना व ज्ञान याचे महत्त्व सांगतात. मानवाची बहिर्मुखता कमी करून त्यांना अंतर्मुख होण्याकडे प्रवृत्त करतात. मानवी जीवनाचे महत्त्व समजून स्वरूपाचा विचार करा असा वारंवार संदेश देतात. या ग्रंथांचे नीट समजून व योग्य वयात वाचन केल्यास आजच्या भौतिक वादी समाजातील बरेच प्रश्न सुटायला मदत होईल. समाज खऱ्या अर्थाने आनंदी व समाधानी होईल.
3. अशा धार्मिक ग्रंथात सांगितलेल्या ज्ञानाचा समावेश आजच्या अभ्यासक्रमात देखील व्हावा. त्यामुळे चांगले मूल्य जोपासलेली नवीन पिढी तयार करता येईल.
4. वेणा स्वामींचे चरित्र आपल्याला सांगते की स्वतःची उन्नती तर करायचीच पण त्याचबरोबर समाज स्थितीकडे जागरूकपणे लक्ष देऊन देशाच्या आणि धर्माच्या कार्यात सहभागी व्हायचे.

## संदर्भ ग्रंथ

[1] श्रीमंत ग्रंथराज दासबोध, प्रकाशक दासबोध प्रसार मंडळ मिरज - सांगली, महाराष्ट्र.
[2] श्री समर्थ शिष्या श्री वेणास्वामीकृत रामायण, प्रकाशक श्री संत वेणास्वामी स्वामी मठ, मिरज, महाराष्ट्र.
[3] श्री सीता स्वयंवर, लोकव्रत प्रकाशन, ISBN - 978-93-80230-12-2.
[4] महाराष्ट्रातील संत परंपरा' डॉक्टर आरती दातार, डायमंड पब्लिकेशन्स.
[5] दैनिक दिव्य मराठी ई पेपर